सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☏२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☏२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

## सहायक आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, महापालिका वरिष्ठ सेवा,गट-अ

**क्रमांक : बीएम/१०(१)(३)/३०७/२०२०/पंधरा** **जाहिरात क्रमांक: ००४/२०२१**

आयोगामार्फत बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील सहायक आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, महापालिका वरिष्ठ सेवा, गट-अ या पदाच्या १६ जागांसाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

**२. एकूण पदसंख्या:-१६**

**२.१** भरावयाच्या पदांच्या सामाजिक / समांतर आरक्षणाबाबतचा तपशील खालील प्रमाणे आहे :-

| जात प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | वि.मा.प्र. | आ.दु.घ. | इ.मा.व. | एकूण मागासवर्गीय | अराखीव | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| एकूण | २+२▼ | १▼ | -- | -- | -- | १▼ | -- | २ | ३▼ | ९ | ५ | १६ |
| सर्वसाधारण | ३ | १ | -- | -- | -- | १ | -- | १ | २ | ७ | ३ | ११ |
| महिला (३०%) | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | १ | २ | २ | ५ |
| खेळाडू (५%) | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| दिव्यांग :- एकूण पदांपैकी एक पद कर्णबधीरता अथवा ऐकू येण्यातील दुर्बलता या दिव्यांग प्रवर्गासाठी आरक्षित. | | | | | | | | | | | | |

**२.२** ▼सदर पदे अनुशेषाची आहेत.

**२.३** वर नमूद केलेल्या पदसंख्येत व आरक्षणात बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या संबंधित विभागाच्या सूचनेनुसार बदल होण्याची शक्यता आहे.

**२.४** भज-ड वर्गवारीसाठी राखीव असलेले पद आंतरपरिवर्तनीय असून सदर वर्गवारीतील पात्र उमेदवार न आढळल्यास सदर पदासाठी वि.जा.(अ), भ.ज.ब), भ.ज.(क) यापैकी उपलब्ध वर्गवारीच्या उमेदवाराचा विचार गुणवत्तेच्या आधारावर करण्यात येईल.

**३. पात्रतेचे निकष :-**

**३.१ भारतीय नागरिकत्व**

**३.२ वयोमर्यादा:-**

**३.२.१ किमान व कमाल वयोमर्यादा:-**

| वयोमर्यादा गणण्याचा दिनांक | किमान वय | कमाल वय | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | सर्वसाधारण / महिला | | प्राविण्य प्राप्त खेळाडू | | माजी सैनिक | | दिव्यांग उमेदवार | |
| | | अमागास | मागासवर्गीय | अमागास | मागासवर्गीय | अमागास | मागासवर्गीय/ अनाथ | अमागास | मागासवर्गीय |
| १ ऑक्टोबर, २०२१ | १८ | ४० | ४५ | ४३ | ४५ | सैनिकी सेवेचा कालावधी अधिक ३ वर्षे | | ४५ | ४५ |

**३.२.२** बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांना उच्चतम वयोमर्यादा शिथिलक्षम राहील.

**३.२.३** मागासवर्गीय आणि खेळाडू व्यक्तींसाठी वयोमर्यादेच्या शिथिलतेसंदर्भातील अनुज्ञेय सवलतींपैकी अधिकतम एकच सवलत देय राहील.

**३.३ शैक्षणिक अर्हता :-**

**३.३.१** Candidate must possess a degree in Arts, Science, Law, Commerce, Medicine or Engineering of recognised university or an equivalent qualification.

**३.३.२** मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान आवश्यक.

**३.३.३** उमेदवार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र किंवा तत्सम किंवा उच्चतम परीक्षेत १०० गुणांचा मराठी विषय (निम्नस्तर किंवा उच्चस्तर)घेवून उत्तीर्ण असावा किंवा महाराष्ट्र शासनाच्या एतदर्थ मंडळामार्फत घेण्यात येणारी मराठी भाषेची निम्नस्तर व उच्चस्तर परीक्षा उत्तीर्ण झालेला असावा.

**आणि तद्नंतर**

**३.४ अनुभव :-**

**३.४.१** Have administrative, executive or supervisory experience in a responsible capacity for not less than five years in Government, Semi-Government or any big industrial or commercial concern.

**३.४.२** The experience of ex-armed force officers will be considered as supervisory experience for the duration they served in armed forces as commissioned officers.

**३.४.३** Candidate should mention all details and submit evidence regarding administrative experience, supervisory experience or executive experience on responsible post.

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA

**३.४.४ जबाबदारीच्या पदासंदर्भातील व्याख्या :-**

(१) 'जबाबदारीच्या पदावर' म्हणजे शासनामधील किंवा सरकारी क्षेत्रातील संस्था किंवा परिसंस्था यामधील वेतनबँड M-23 रुपये ४१८००-१३२३०० किंवा त्यापेक्षा जास्त वेतनबँड व ग्रेडपेमधील राजपत्रित पद असा घेण्यात यावा. तसेच यामध्ये सदर वेतनबँड व ग्रेडपेमधील पदाची समकक्षता सुनिश्चित करता येईल, अशा अन्य क्षेत्रातील पद देखिल विचारात घेता येईल.

(२) खाजगी संस्थेतील 'जबाबदारीचे पद' म्हणजे उच्च श्रेणीतील वरिष्ठ व्यवस्थापकीय पदांचा अनुभव हा जबाबदारीच्या पदावरील अनुभव म्हणून सदर पदासाठी ग्राह्य धरण्यात येईल.

(३) 'मोठ्या औद्योगिक संस्था' म्हणजे अशी शासकीय/खाजगी संस्था जेथे १००० पेक्षा अधिक सेवकवर्ग कार्यरत आहेत.

**४. शैक्षणिक अर्हता व अनुभवाचा कालावधी गणना करण्याचा दिनांक:- २६ जुलै, २०२१.**

४.१ प्रस्तुत जाहिरातीस अनुसरुन अर्ज सादर करण्याकरीता विहित केलेल्या अंतिम दिनांकास संबंधित शैक्षणिक अर्हता धारण करण आवश्यक राहील.

४.२ अनुभवाच्या कालावधीची गणना प्रस्तुत जाहिरातीस अनुसरुन अर्ज सादर करण्याकरीता विहित केलेल्या अंतिम दिनांकास करण्यात येईल.

**५. निवड प्रक्रिया :-**

५.१ प्रस्तुत पदाच्या निवडीसाठी वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाची लेखी परीक्षा आणि मुलाखत अशा दोन टप्प्यांमध्ये भरतीप्रक्रिया राबविण्यात येईल. लेखी परीक्षेचा दिनांक यथावकाश प्रसिध्द करण्यात येईल.

५.२ लेखी परीक्षा घेण्यात येणार असल्यामुळे जाहिरातीतील विहित मूळ अर्हता आणि/ अथवा अनुभव शिथिल केला जाणार नाही.

५.३ परीक्षेचा अभ्यासक्रम , परीक्षा योजना, परीक्षेचे माध्यम व इतर बाबी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येतील.

५.४ परीक्षेचे स्वरुप :-

(१) परीक्षा वस्तुनिष्ठ व बहुपर्यायी स्वरुपाची असून २०० गुणांची व १ तास कालावधीची राहील.

(२) प्रत्येक चार चुकीच्या उत्तरांमागे एका प्रश्नाचे गुण एकूण गुणांमधून वजा करण्यात येतील.

(३) परीक्षेत उत्तीर्ण होण्यासाठी सर्वसाधारण प्रवर्गाच्या उमेदवारास किमान ३५% व आरक्षित प्रवर्गातील उमेदवारास ३०% गुण मिळविणे आवश्यक राहील.

(४) दिव्यांगांकरीता २०% गुण मिळवणे आवश्यक राहील.

(५) मुलाखतीसाठी ५० गुण राहतील.

(६) अंतिम निवडीकरीता विचार होण्यासाठी उमेदवाराने मुलाखतीमध्ये किमान ४१% गुण मिळविणे आवश्यक राहील.

(७)अंतिम गुणवत्ता यादी लेखी परीक्षेतील व मुलाखतीतील एकत्रित गुणांवर आधारित असेल.

५.५ प्रस्तुत जाहिरातीमध्ये नमूद केलेली शैक्षणिक पात्रता, अनुभव इत्यादी अर्हता किमान असून, किमान अर्हता धारण केली म्हणून उमेदवार मुलाखतीस बोलाविण्याकरीता पात्र असणार नाही.

५.६ सेवा भरतीबाबतची संपूर्ण प्रक्रिया सहायक आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, महापालिका वरिष्ठ सेवा, गट-अ या पदाच्या (सेवा प्रवेश नियम), १९६५ आणि तद्नंतर वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारणा तसेच आयोगाच्या कार्यनियमावलीतील तरतुदीनुसार राबविण्यात येईल.

५.७ परिविक्षाधीन कालावधी ३ वर्षे राहील.

**६. अर्ज करण्याची पद्धत:-**

६.१ अर्ज फक्त ऑनलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येतील.

६.२ ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना आयोगाच्या https://mpsconline.gov.in तसेच https://mpsc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

६.३ आयोगास अर्ज सादर करताना माध्यमिक शालांत प्रमाणपत्रावर असलेल्या नावाप्रमाणेच नोंदणी करणे व आयोगास अर्ज सादर करणे अनिवार्य आहे.

६.४ अर्ज सादर करण्याकरीता संकेतस्थळ :- https://mpsconline.gov.in

**६.५ अर्ज सादर करण्याचे टप्पे :-**

६.५.१ आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीवर यापुर्वी विहित पध्दतीने नोंदणी केली नसल्यास नोंदणी करुन खाते (Profile) तयार करणे.

६.५.२ खाते तयार केलेले असल्यास व ते अद्ययावत करण्याची आवश्यकता असल्यास अद्ययावत करणे.

६.५.३ विहित कालावधीत व विहित पध्दतीने अर्ज सादर करणे.

६.५.४ परीक्षा शुल्काचा भरणा विहित पध्दतीने करणे.

६.६ अर्ज सादर करण्याचा कालावधी :- **दिनांक २५ जून, २०२१ रोजी दुपारी १४:०० ते २६ जुलै, २०२१ रोजी २३.५९ वाजेपर्यंत.**

६.७ आयोगास अर्ज सादर केल्यानंतर विहित मुदतीत परीक्षा शुल्क भरल्याशिवाय अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

**६.८ शुल्क रुपये**

६.८.१ अमागास - रुपये ७१९/-

६.८.२ मागासवर्गीय व अनाथ - रुपये ४४९/-

६.८.३ उपरोक्त परीक्षा शुल्काव्यतिरिक्त बँक चार्जेस तसेच त्यावरील देय कर अतिरिक्त असतील.

६.८.४ परीक्षा शुल्क ना परतावा (Non-refundable) आहे.

६.९ परीक्षा शुल्काचा भरणा करण्याकरिता उमेदवारांनी खाली नमूद केलेल्या पद्धतींचा अवलंब करावा:-

६.९.१ शुल्क भरण्याकरिता मुख पृष्ठावरील 'माझे खाते' या लिंक वर क्लिक करावे.

६.९.२ 'माझे खाते' या लिंक वर क्लिक केल्यानंतर अर्ज केलेल्या पदांची यादी शुल्क भरल्याच्या / न भरल्याच्या नोंदीसह दिसेल. 'Unpaid' लिहिलेल्या जाहिरात / पद / परीक्षेसमोर ' Pay Now' अशी लिंक उपलब्ध असेल.

६.९.३ 'Pay Now' या लिंक वर क्लिक केल्यानंतर दोन पर्याय उपलब्ध होतील :- (१) ऑनलाईन पेमेंट (२) चलनाव्दारे.

६.९.४ क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड, युपीआय अथवा नेटबँकिंगच्या सहाय्याने ऑनलाईन परीक्षा शुल्क अदा करता येईल.

६.९.५ चलनाद्वारे परीक्षाशुल्क भरण्याचा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणा-या चलनाची प्रत घेऊन भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेत, बँकेच्या कार्यालयीन वेळेत शुल्काचा भरणा केला जाऊ शकतो.

६.९.६ भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे शुल्क भरण्याचा पर्याय निवडल्यास अर्ज सादर केल्याच्या दोन तासानंतर अथवा शेवटच्या दिवशी अर्ज सादर केल्यास त्यापुढील कामकाजाच्या दिवशी बँकेच्या कार्यालयीन वेळेत परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे.

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA

**६.९.७** ऑनलाईन परीक्षा शुल्क भरणे तसेच भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरावयाचे झाल्यास चलनाची प्रत घेणे याकरीता विहित अंतिम **दिनांक २६ जुलै २०२१ रोजी २३.५९ वाजेपर्यंत.**

**६.९.८** चलनाद्वारे परीक्षाशुल्क भरावयाचे झाल्यास भारतीय स्टेट बँकेमध्ये शुल्क भरण्याचा अंतिम **दिनांक २७ जुलै, २०२१** - बँकेच्या कार्यालयीन वेळेत.

**६.९.९** ऑनलाईन पध्दतीने परीक्षा शुल्काचा भरणा केल्यानंतर उमेदवाराला त्याच्या प्रोफाईलमध्ये परीक्षा शुल्काचा भरणा झाला आहे किंवा कसे याची स्थिती (status) लगेचच अवगत होईल. ऑनलाईन पध्दतीने परीक्षा शुल्क भरले असल्याबाबत **Logout** करण्यापूर्वीच शुल्क भरले असल्याची खात्री करणे आवश्यक आहे. जर परीक्षा शुल्काचा भरणा झाल्याबाबतची स्थिती उपलब्ध नसेल तर शुल्क पुन्हा भरण्याची कार्यवाही प्रस्तुत परीक्षेच्या अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापूर्वीच करणे आवश्यक आहे.

**७. संवर्ग/पद तसेच आरक्षणासंदर्भात सर्वसाधारण तपशील:-**

**७.१ सर्वसाधारण:-**

**७.१.१ वेतन श्रेणी :** एम-३५ रुपये ६७७००-२०८७०० अधिक नेहमीचे अनुज्ञेय भत्ते+ रुपये १५००/- विशेष भत्ता.

**७.१.२ कर्तव्ये व जबाबदा-या:**-प्रस्तुत पदाची कर्तव्ये व जबाबदा-या याबाबतचा तपशील आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**७.१.२** सेवा प्रवेशाच्या प्रयोजनासाठी शासनाने मागास म्हणून मान्यता दिलेल्या समाजाच्या वयोमर्यादेमध्ये सवलत घेतलेल्या उमेदवारांचा अराखीव (खुला) पदावरील निवडीकरीता विचार करण्याबाबत शासनाच्या धोरणानुसार कार्यवाही करण्यात येईल. याबाबतचा तपशील वेळोवेळी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

**७.१.३** अराखीव (खुला) पदाकरीता विहित केलेल्या वयोमर्यादा तसेच इतर पात्रता विषयक निकषासंदर्भातील अटींची पूर्तता करणाऱ्या सर्व उमेदवारांचा (मागासवर्गीय उमेदवारासह) अराखीव (खुला) सर्वसाधारण पदावरील शिफारशीकरीता विचार होत असल्याने, सर्व आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांनी त्यांच्या प्रवर्गासाठी पद आरक्षित/उपलब्ध नसले तरी अर्जामध्ये त्यांच्या मूळ प्रवर्गासंदर्भातील माहिती अचुकपणे नमुद करणे बंधनकारक आहे.

**७.२ आरक्षण:-**

विविध मागास प्रवर्ग, महिला, प्राविण्यप्राप्त खेळाडू, अनाथ इत्यादिंसाठी सामाजिक व समांतर आरक्षण शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात येणाऱ्या आदेशानुसार राहील

**७.३ पात्र दिव्यांग व्यक्ती:-**

**७.३.१** शासन निर्णय , नगर विकास विभाग, क्रमांक दिव्यांग— २०१९/ प्र.क्र.३३ /नवि-२८ दि. १६.०४.२०२१ नुसार प्रस्तुत सहायक आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, महापालिका वरिष्ठ सेवा, गट-अ संवर्गाकरीकता पदाची सुनिश्चिती राहील .

**७.३.२** दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ च्या आधारे शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक दिव्यांग २०१८/प्र.क्र.११४/१६ अ, दिनांक २९ मे, २०१९ तसेच यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार दिव्यांग व्यक्तींच्या आरक्षणासंदर्भात कार्यवाही करण्यात येईल.

**७.३.३** दिव्यांग व्यक्तींसाठी असलेल्या वयोमर्यादेचा अथवा इतर कोणत्याही प्रकारचा फायदा घेऊ इच्छिणा-या उमेदवारांनी शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक अप्रकि-२०१८/प्र.क्र.४६/आरोग्य-६, दिनांक १४ सप्टेंबर, २०१८ मधील आदेशानुसार केंद्र शासनाच्या www.swavlambancard.gov.in या संगणकीय प्रणालीदवारे वितरित करण्यात आलेले नवीन नमुन्यातील दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे अनिवार्य आहे.

८. प्रस्तुत जाहिरातीमध्ये भरतीप्रकियेसंदर्भातील संक्षिप्त तपशील दिलेला आहे. अर्ज स्वीकारण्याची पध्दत, आवश्यक अर्हता, आरक्षण, वयोमर्यादा, निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया इत्यादीबाबतच्या सविस्तर तपशीलासाठी आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावरील 'उमेदवारांना सर्वसाधारण सूचना' द्वारे उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीचे कृपया अवलोकन करावे. आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली माहिती अधिकृत समजण्यात येईल.

९. सविस्तर जाहिरात आयोगाच्या https://mpsc.gov.in तसेच https://mpsconline.gov.in या संकेतस्थळांवर उपलब्ध आहे.

ठिकाण : मुंबई.
दिनांक : २४ जून, २०२१

उप सचिव, सरळ सेवा
महाराष्ट्र लोकसेवा आयोग.

(१) आयोगाच्या कार्यालयात, परीक्षा कक्षात, परीक्षा केंद्राच्या परिसरात, तसेच, शारीरिक चाचणी व मुलाखतीच्या वेळी मोबाईल फोन, अथवा इतर कोणत्याही प्रकारची इलेक्ट्रॉनिक साधने आणण्यास व वापरण्यास सक्त मनाई आहे.
(२) मुलाखतीच्यावेळी सर्व आवश्यक मूळ प्रमाणपत्र सादर न केल्यास सदर परीक्षेची उमेदवारी नाकारली जाईल.

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA